3.6.1 A2



**जिल्हाधिकारी कार्यालय जालना.**
(रोहयो विभाग)
प्रशासकीय इमारत,स.न.४८८,रिंग रोड,जालना.

दुरध्वनी क्रमांक : ०२४८२/२२४९५४ फॅक्स क्रमांक :०२४८२/२२४९५४/२२५३२६
E-mail ID : dycolljalna @ mahmgnrega.com संकेत स्थळ : www.jalna.nic.in

जा.क्र.२०१४/मग्रारोहयो/कार्या- २/कावि- दिनांक :- २९/०१/२०१४

प्रति,
श्रीमती.हेमलता कुलकर्णी (प्राचार्या)
समाजकार्य महाविदयालय,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

विषय:- जालना जिल्हामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची माहिती व अनुषंगिक कामांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविण्याबाबत.

संदर्भ:- दुरध्वनी वरून दिनांक-28/01/2014 रोजी झालेले संभाषण.

महोदया,

वरील विषयी चर्चा झाल्यानुसार आपणास कळविण्यात येते की, जालना जिल्हामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची माहिती गावकऱ्यांना होण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवल्यास त्याचा फायदा गावकऱ्यांना व आपल्या विद्यार्थ्यांना देखील होऊ शकतो.

त्या दृष्टीने आपल्या महाविद्यालयातर्फे राबवण्यात येणाऱ्या प्रोजेक्ट नुसार विद्यार्थ्यांना ग्रामीण भागामध्ये अनुभवासाठी आपण कळविल्यानुसार बदनापूर व जालना या दोन तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांची राहण्याची व प्रवासाची व्यवस्था जालना मुख्यालयातून करण्यात येईल. तरी आपण सदरील विद्यार्थ्यांना दोन ग्रुप मध्ये विभागून द्यावेत.

उपजिल्हाधिकारी (रोहयो)
जालना

Scanned by CamScanner